आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० नोव्हेंबर २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- युवकांची हीच निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनात कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सहकार्य करण्याचं सरकारचं विरोधी पक्षांना आवाहन

- दिल्ली बाँबस्फोट, मतदारयाद्या पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधक सरकारला घेरण्याच्या तयारीत

- नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी केला एफआयआर

**आणि**

- सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत किदंबी श्रीकांतचा सामना हाँगकाँगच्या जेसन गुनावन बरोबर

**<><><><><>**

युवकांची हीच निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात च्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. तीव्र इच्छा, सामूहिक शक्ती, आणि संघभावनेनं काम करण्यावर विश्वास तर कठीण कामातही यश मिळतं असं ते म्हणाले. या संदर्भात त्यांनी इस्त्रोनं मंगळ ग्रहासारख्या वातावरणात जीपीएस प्रणालीशिवाय ड्रोन उडवण्याची आयोजित केलेल्या स्पर्धेची, एक चित्रफित पाहिल्याचा अनुभव सामायिक केला. या स्पर्धेत पुण्यातल्या एका संघानं यश मिळवल्याचा उल्लेख त्यांनी केला.

- **- होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - -**

हैदराबाद मध्ये स्कायरूटच्या इन्फिनिटी संकुलाच्या उद्घाटनानं भारताच्या अवकाश परिसंस्थेला नवी उंची गाठून दिली आहे. यातून नव्या भारताची मानसिकता आणि युवा शक्तीचं प्रतिबिंब उमटलं असल्याचं ते म्हणाले. हैदराबाद इथं विमानांच्या देखभाल, दुरुस्ती

आणि संपूर्ण तपासणी केंद्राचं उद्घाटन, नौदलाच्या ताफ्यात स्वदेशी बनवटीच्या आयएनएस माहे या युद्धनौकेचा झालेला समावेशाचा उल्लेखही त्यांनी केला. येत्या ४ डिसेंबरला साजरा होणारा नौदल दिन म्हणजे, आपल्या नौदल सैनिकांचं साहस आणि पराक्रमाचा सन्मान करणारा दिवस असल्याचं ते म्हणाले.

या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी देशभरातल्या विविध नौदल संग्राहलयांविषयी माहिती दिली, आणि या संग्रहालयांनी भेट द्यावी असं आवाहनही श्रोत्यांना केलं.

कृषी क्षेत्रातली देशाची प्रगतीही त्यांनी श्रोत्यांशी सामायिक केली. देशानं ३५७ दशलक्ष टन इतक्या प्रमाणात अन्नधान्याचं उत्पादन करून ऐतिहासिक विक्रम केला.

गेल्या काही वर्षांत मधाची निर्यात तीन पटीपेक्षा जास्त झाली आहे, देशाचं मध उत्पादन दीड लाख टनांपेक्षा जास्त झालं आहे, मध अभियानाअंतर्गत खादी ग्रामोद्योगानं सव्वा दोन लाखापेक्षा जास्त मधमाशी पालन पेट्यांचं वाटप केलं आहे अशी माहिती त्यांनी दिली.

क्रीडा क्षेत्रातल्या यशाचा उल्लेखही त्यांनी केला. महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धेचं जेतेपद यासह जपानमधल्या कर्णबधीर व्यक्तींच्या डेफ ऑलिम्पिक, तसंच जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत भारतानं केलेली पदकांची लयलुट याविषयी त्यांनी सांगितलं. दृष्टीहीन महिलांनी जिंकलेला पहिलाच टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक म्हणजे देशाच्या क्रीडा इतिहासातल्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे असं ते म्हणाले.

प्रधानमंत्र्यांनी देशाचा गौरव वाढवणाऱ्या सांस्कृतिक आणि इतर घडामोडींचाही उल्लेख केला. काही दिवसांपूर्वीच साजरा झालेला संविधान दिन, तसंच वंदे मातरम् या गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल देशभरात होत असलेले कार्यक्रम, अयोध्येत राम मंदिरावर झालेलं धर्मध्वजाचं आरोहण, कुरुक्षेत्रातल्या पांचजन्य स्मारकाचं लोकार्पण यांविषयी त्यांनी सांगितलं. कुरुक्षेत्रात झालेल्या आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवानिमित्तानं विविध देशांत झालेल्या कार्यक्रमांची माहिती त्यांनी दिली.

राष्ट्रीय संग्रहालयातले भगवान बुद्धांचे पवित्र अवशेषांचं भूतान, रशियासह, मंगोलिया, व्हिएतनाम आणि थायलंड अशा अनेक देशांमध्ये प्रदर्शित केले जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला. अशा प्रयत्नांमधून जगभरातले लोक परस्परांशी जोडले जात आहेत असं ते म्हणाले.

नुकत्याच झालेल्या जी ट्वेंटी परिषदेच्या निमित्तानंही आपण व्होकल फॉर व्होकल हा मंत्र जपला, आणि जागतिक नेत्यांना दिलेल्या भेटवस्तूंमध्ये स्थानिक भावनेवरच भर दिला असं ते म्हणाले. आगामी ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या खरेदीसाठीही नागरिकांनी व्होकल फॉर लोकल हा मंत्र लक्षा ठेवावा आणि देशात बनलेल्या वस्तुंची खरेदी करावी असं आवाहन त्यांनी केलं.

नुकत्याच सुरु झालेल्या थंडीच्या हंगामाचा उल्लेख करून, त्यांनी देशाच्या हिवाळी पर्यटन क्षमतांबद्दल सांगितलं. यंदाच्या हिवळ्यात पर्यटनाचा विचार करताना देशातच हिमालयातील डोंगररांगाचा विचार करावा असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरु होत असून त्या पार्श्वभूमीवर  सरकारने आज सकाळी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती.  या अधिवेशनात  मतदार पुनरिक्षण, दिल्ली बॉम्बस्फोट तसंच परराष्ट्र संबधांबद्दल विरोधी पक्ष प्रश्न उपस्थित करतील अशी शक्यता आहे. अधिवेशनात अनेक नवीन विधेयके आणली जाणार आहेत, या पार्श्वभूमीवर संसदेचं कामकाज सुरळीत चालावं अशी भूमिका सरकारतर्फे संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू तसंच राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी मांडली. जयराम रमेश, गौरव गोगोई, प्रमोद तिवारी या काँग्रेसच्या नेत्यांनी तसंच डीएमके चे टी आर बालू, तृणमूलचे डेरेक ओ ब्रायन तसंच IUML चे ई टी मोहम्मद बशीर यांनी विरोधी पक्षांची भूमिका मांडली. आरजेडीचे मनोज झा, संयुक्त जनता दलाचे संजय झा, अकाली दलाच्या शिरोमणी अकाली दलाच्या हरसिम्रत कौर हे नेतेही बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. मनी लाँडरिंग प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या तक्रारीवरुन दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने हा एफआयआर नोंदला आहे. काँग्रेसचे अन्य नेते सुमन दुबे, सॅम पित्रोदा यांच्यासह एकूण ९ जणांविरुद्ध  कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई खोडसाळ पणाची असून केवळ काँग्रेस नेत्यांना अडचणीत आणण्यासाठी केली जात असल्याची टीका पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली आहे.

<><><><><>

मतदारयाद्या पुनरिक्षणाची मुदत केंद्रीय आयोगाने आठवडाभराने वाढवली आहे. ९ राज्य आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमधे सध्या ही प्रक्रीया सुरु आहे. सुधारित अधिसूचनेनुसार मतदारयादीत नाव नोंदणीसाठी ११ डिसेंबरपर्यंत अर्ज करता येईल. प्रारूप मतदार याद्या १६ डिसेंबरला प्रसिद्ध होतील. पुढच्या वर्षी १४ फेब्रुवारीला अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध होतील.

<><><><><>

एनडीए अर्थात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४९ व्या तुकडीचं दीक्षांत संचलन पुण्यात खडकवासला इथं आज सकाळी झालं. कॅडेट सिद्धार्थ सिंग यांनी या संचलनाचं नेतृत्व केलं. याप्रसंगी ३२९ कॅडेट्स संरक्षण दलात दाखल झाले. नौदल प्रमुख ऍडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी या संचलनाचं निरीक्षण केलं. याप्रसंगी कॅडेट दीपक कांडपाल यांना सुवर्णपदक, सिद्धार्थ सिंग यांना रौप्य पदक तर सिद्धी जैन यांना कांस्यपदक प्रदान करण्यात आलं.

<><><><><>

सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटनचा अंतिम फेरीचा सामना आज लखनौ इथं बाबू बनारसीदास इनडोअर स्टेडियम इथे होईल. अंतिम फेरीत भारताचा बॅडमिंटनपटू किदंबी श्रीकांत आणि हाँगकाँगचा जेसन गुनावन यांच्यामध्ये सामना रंगेल. महिला दुहेरीत गायत्री गोपीचंद आणि ट्रीसा जॉली यांची लढत जपानच्या कोहो ओसावा आणि माई तानाबे यांच्याबरोबर होईल.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून प्रारंभ होत आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना आज झारखंडमध्ये रांची इथं हा सामना होत आहे. नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रीका संघानं प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. कसोटी मालिकेत झालेल्या निराशाजनक पराभवानंतर आजपासून सुरू होणाऱ्या मालिकेत के एल राहुलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ पुनरागमन करण्यास उत्सुक असेल. तर टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखाली दक्षिण

आफ्रिकेचा संघ मालिकेत आघाडी घेण्याचा प्रयत्न करेल. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा एकदिवसीय सामन्यांसाठीच्या संघात समावेश करण्यात आला आहे.

<><><><><>

चीनमध्ये चेंगडू इथं आजपासून आयटीटीएफ मिश्र सांघिक विश्व चषक स्पर्धेला सुरुवात होत आहे. या सामन्यांसाठी भारताच्या आठ टेबलटेनिस खेळाडूंच्या संघाचं नेतृत्व मनिका बत्रा आणि मानव ठक्कर करणार आहेत. मनिका आणि मानव राष्ट्रकुल स्पर्धेचे विजेते आहेत. भारतीय संघात  ऑलिंपियन साथिया ज्ञानसेकरनचासुद्धा समावेश आहे.

<><><><><>

भारतीय हॉकी संघानं सुलतान अजलनशाह चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. आज होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची लढत बेल्जियमशी  होणार आहे.

दरम्यान ,चेन्नईमध्ये सुरू असलेल्या पुरुषांच्या हॉकी कनिष्ठ गट  विश्वचषक स्पर्धेत भारताने काल ओमानवर १७-० असा दणदणीत विजय मिळवला. भारताने दोन सामन्यांत एकंदर २४ गोल करून गट ब मध्ये आघाडी घेतली असून भारताचा पुढील सामना स्वित्झर्लंडविरुद्ध होणार आहे.

<><><><><>

एअर बस कंपनीच्या ३३८ विमानांपैकी ३२३ विमानांच्या सॉफ्टवेअरचं अद्ययावतीकरण पूर्ण झालं असल्याची  माहिती नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयानं दिली आहे. अद्ययावतीकरण झालेली विमानं इंडिगो, एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस या विमान कंपन्यांची असल्याचं त्यांनी कळवलं आहे. एअरबस थ्री ट्वेंटी प्रकारातल्या विमानांच्या नियंत्रक सॉफ्टवेअर मधे बिघाड झाल्याचं समजल्यावर त्या  सर्व विमानांचं उड्डाण तात्काळ थांबवण्याचे आदेश महासंचालनालयानं काल दिले होते.

<><><><><>

दितवा चक्रीवादळ आता उत्तर तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि आंध्र प्रदेश किनारपट्टीकडे सरकण्याची शक्यता आहे.

त्यामुळे तामिळनाडू आणि पुदुच्चेरी किनाऱ्यावर सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. किनारी भागात मध्यम पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. आंध्र प्रदेश किनारपट्टी, यानम आणि रायलसीमा या भागांमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अति

मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात  विदर्भात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

वादळाच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार, तटरक्षक दल आणि संबंधित राज्य शासनाच समन्वय राखण्यात येत आहे. केंद्रीय गृह सचिवांनी तामिळनाडू, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या मुख्य सचिवांशी बैठक घेऊन सतर्कता बाळगण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान या वादळामुळे श्रीलंकेत आलेल्या पूर आणि भूस्खलनात मृतांची संख्या १५९ झाली असून २०३ जण अद्याप बेपत्ता आहेत. बचावकार्यात भारताच्या पथकांचा समावेश आहे.

// <><><><><>//